दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. २० मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २३४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

बुधवार, दि. २० मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, चतुर्थी सकाळी ११-०७ पर्यंत नंतर पंचमी, दिवस नक्षत्र-आर्द्रा सकाळी ६-१२ पर्यंत नंतर पुनर्वसु रात्री ४-१२ पर्यंत, चंद्र रास - रात्री १०-३९ पर्यंत मिथुन नंतर कर्क, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

### इंधन संकटाची भीती

**पिंपरी** : शनिवारी दुपारनंतर आणि रविवारी सकाळपासून शहरातील अनेक पेट्रोल पंप अचानक बंद दिसू लागल्याने नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. पेट्रोल संपले, सेवा तात्पुरती बंद, नो स्टॉक, असे फलक अनेक पंपांवर झळकू लागल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काही ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तर, काही वाहनचालकांना एका पंपावरून दुसऱ्या पंपावर भटकंती करावी लागल्याचे दिसून आले.

## सारांश वृत्त

### एफडीएच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढेंची नियुक्ती

**मुंबई :** ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून एफडीएचे विद्यमान आयुक्त श्रीधर दुबे यांची बदली करण्यात आली आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमएमआरसीएल) व्यवस्थापकीय संचालकपदी कान्हुराज बगाटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### बांदा तापले, पारा ४२.२ अंशांवर

**लखनौ :** उत्तर प्रदेशात मंगळवारी तीव्र उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत असून राज्यातील ७५ पैकी २२ जिल्ह्यांमध्ये तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. बांदा हे राज्यातील सर्वात उष्ण ठिकाण ठरले असून कमाल तापमान ४८.२ अंश सेल्सिअस नोंदले गेले. हवामान खात्याने सांगितले की, दक्षिण उत्तर प्रदेशात अनेक ठिकाणी आणि राज्याच्या उर्वरित भागात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तसेच पश्चिम उत्तर प्रदेशात एकाकी ठिकाणी उबदार रात्रीचा इशारा देण्यात आला आहे.


### राजधानी दिल्लीत ऑरेंज अलर्ट

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय राजधानीत मंगळवारी महिन्यातील पहिल्या उष्णतेच्या लाटेची नोंद झाली, कोरडे वारे आणि कडक उन्हामुळे तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले. हवामान खात्याने येत्या काही दिवसांत उष्णतेच्या लाटेसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्यानुसार, सफदरजंग येथे कमाल तापमान ४५.१ अंश सेल्सिअस नोंदले गेले, जे सामान्य तापमानापेक्षा ४.७ अंशांनी जास्त आहे.

### पश्चिम बंगाल सरकारचा मोठा निर्णय; केंद्राच्या प्रकल्पांना मिळणार गती

# सिलीगुडी कॉरिडॉरचा ताबा केंद्राकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सत्तांतरानंतर मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी ॲक्शन मोडमध्ये दिसत असून, सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या सिलीगुडी कॉरिडॉरबाबत मोठा निर्णय घेतला आहे. सिलीगुडी कॉरिडॉरलगतची शेकडो एकर जमीन केंद्र सरकारकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारने राष्ट्रीय महामार्गांचे सात टप्पे केंद्रीय संस्थांकडे सुपूर्द करण्यास मंजुरी दिल्यानंतर अवघ्या काही दिवसांत ही घडामोड समोर आली आहे.

सिलीगुडी कॉरिडॉरमधून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गांची जबाबदारी केंद्र सरकारकडे द्यावी, अशी मागणी केंद्र सरकारकडून करण्यात येत होती. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या प्रक्रियेला जाणीवपूर्वक विलंब करत असल्याचा आरोप केंद्राने यापूर्वी केला होता. आता शुभेंदू अधिकारी सरकारने जाहीर केले आहे की, या कॉरिडॉरमधील महामार्गांची जबाबदारी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि नॅशनल हायवेज अँड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडकडे सोपवण्यात येणार आहे.

राज्य सरकारच्या मंजुरीनंतर एनएच-३१, एनएच-३३, एनएच-३१२ यांसह सात राष्ट्रीय महामार्गांची देखरेख आता केंद्र सरकारकडे जाणार आहे. तसेच कोरोनेशन ब्रिज, हासीमारा-जयगाव आणि चांगरबांधा कॉरिडॉरसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांची जबाबदारीही एनएचआयडीसीएलकडे दिली जाणार आहे. यापूर्वी हे सर्व प्रकल्प राज्य सरकारच्या अखत्यारित होते. मात्र, गेल्या वर्षभरापासून या कामांना मंजुरी मिळत नव्हती. आता केंद्रीय संस्था थेट काम हाती घेणार असल्याने प्रकल्पांच्या गतीत मोठी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सिलीगुडी कॉरिडॉरला 'भारताचा चिकन नेक' म्हणूनही ओळखले जाते. पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारताला जोडणारी ही अवघी २२ किलोमीटर रुंदीची अरुंद पट्टी आहे. या भागाच्या एका बाजूला बांगलादेश, तर दुसऱ्या बाजूला नेपाळ आणि भूतान आहेत. ईशान्येकडील राज्यांना उर्वरित भारताशी जोडणारा हा एकमेव महत्त्वाचा भूमार्ग असल्याने या भागाला प्रचंड सामरिक महत्त्व आहे. चीनकडून या परिसरावर सतत लक्ष ठेवले जात असल्याने भारतासाठी या भागातील पायाभूत सुविधा मजबूत करणे अत्यावश्यक मानले जाते. या जमीन हस्तांतरणाचा सर्वात मोठा फायदा केंद्र सरकारच्या भूमिगत रेल्वे प्रकल्पाला होणार आहे.

पश्चिम बंगाल सरकारच्या या निर्णयामुळे केवळ राष्ट्रीय सुरक्षा मजबूत होणार नाही, तर ईशान्य भारताच्या विकासालाही मोठी चालना मिळेल. रस्ते आणि रेल्वे प्रकल्प वेगाने पूर्ण झाल्यास दार्जिलिंग, डुआर्स आणि सीमावर्ती भागातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. यामुळे व्यापार, पर्यटन आणि औद्योगिक विकासालाही गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## नसरापूर प्रकरणाची २१ मे पासून नियमित सुनावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** नसरापूर येथील चिमुरडीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणाची नियमित सुनावणी २१ मेपासून पुण्यातील विशेष न्यायालयात सुरू होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्र हादरवून सोडणाऱ्या या प्रकरणाचे गांभीर्य आणि पीडितेचे अल्पवय लक्षात घेऊन न्यायालयाने ही सुनावणी 'इन कॅमेरा' पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हा न्यायाधीश तथा विशेष सत्र न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात कडेकोट पोलीस बंदोबस्तात ही प्रक्रिया पार पडणार आहे. ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने अवघ्या १४ दिवसांत ११०० पानी भक्कम दोषारोपपत्र दाखल केले आहे.

या दोषारोपपत्रात सीसीटीव्ही फुटेज, फॉरेन्सिक अहवाल, वैद्यकीय तपासणी अहवाल तसेच पीडितेला आरोपीसोबत शेवटचे पाहिलेल्या साक्षीदारांचे जबाब यांचा समावेश करण्यात आला आहे. तपासात तांत्रिक पुराव्यांवर विशेष भर देण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी सांगितले की, या तपासात आधुनिक तांत्रिक पद्धतींचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. न्यायालयाने घटनास्थळाची प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी विनंतीही त्यांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. हा खटला विक्रमी वेळेत पूर्ण करून आरोपीला कठोर शिक्षा मिळवून देण्याचा प्रयत्न राहील, तसेच पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळेल, असा विश्वासही विशेष सरकारी वकिलांनी व्यक्त केला आहे.

## सरकार मंदिराचे सोने ताब्यात घेणार नाही...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशभरातील मंदिरे आणि धार्मिक संस्थांकडे असलेल्या सोन्याच्या साठ्याबाबत सुरू असलेल्या चर्चांवर केंद्र सरकारने स्पष्ट भूमिका मांडली आहे. मंदिर ट्रस्टकडे असलेले सोने ताब्यात घेण्याची कोणतीही योजना नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

केंद्रीय अर्थ मंत्रालयाने अधिकृत निवेदन जारी करत या संदर्भातील सर्व बातम्या दिशाभूल करणाऱ्या आणि निराधार असल्याचे म्हटले आहे. सोशल मीडिया आणि काही माध्यम अहवालांमध्ये सरकार मंदिरांच्या सोन्याच्या साठ्याच्या बदल्यात गोल्ड बाँड जारी करण्याच्या तयारीत असल्याचा दावा करण्यात येत होता. तसेच मंदिरांचे शिखर, दरवाजे आणि धार्मिक वास्तूंवरील सोन्याच्या पत्र्यांचा समावेश भारताच्या धोरणात्मक सुवर्ण साठ्यात करण्याचा विचार सुरू असल्याच्या अफवाही पसरल्या होत्या. मात्र, सरकारने हे सर्व दावे फेटाळून लावत धार्मिक संस्थांचे सोने मोनेटाइज करण्याचा कोणताही विचार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

नागरिकांनी सोशल मीडियावर फिरणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन अर्थ मंत्रालयाने केले आहे. मंदिरांमधील सोन्याचा साठा सरकार ताब्यात घेणार किंवा तो बाजारात आणणार असल्याच्या बातम्यांना कोणताही आधार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

### ओबीसी प्रवर्गात ४३ नव्या जातींचा समावेशाची शिफारस

# नॉन क्रिमीलेअर मर्यादेत १५ लाखांपर्यंत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील ओबीसी समाजासाठी महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. ओबीसी नॉन क्रिमीलेअरची उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांवरून १५ लाख रुपये करण्याची शिफारस करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ओबीसी उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

याच बैठकीत ओबीसी प्रवर्गात ४३ नव्या जातींचा समावेश करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याचाही निर्णय घेण्यात आला. तसेच ओबीसी जात पडताळणीची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. ओबीसी उपसमितीच्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतींवरही सविस्तर चर्चा झाली. चुकीच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप होऊ नये, यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसी समाजाच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. ओबीसी, विजाभज, एसबीसी आणि इतर मागास घटकांच्या कल्याणासाठी स्वतंत्र इतर मागास बहुजन कल्याण विभाग स्थापन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या विभागामार्फत विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना १०० टक्के फी सवलत दिली जात असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा चालविण्यात येत असून राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये मुला-मुलींसाठी एकूण ७२ वसतिगृहे सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वयंम' योजना सुरू करण्यात आली असून या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना राहणीमान आणि शिक्षणासाठी ६० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. तसेच महाज्योती संस्थेमार्फत यूपीएससी आणि एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणातून यूपीएससीमध्ये २९ तर एमपीएससीमध्ये ११८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ओबीसी महामंडळामार्फत युवकांना १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जात असून या कर्जाला शासन हमी देत आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ न मिळालेल्या घटकांसाठी 'मोदी आवास योजना' राबवण्यात येत असून घरकुलासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. सौरऊर्जेसाठी स्वतंत्र अनुदानही दिले जात असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### विधानपरिषद निवडणुकीमुळे निर्णयाला विलंब होण्याची शक्यता

# आचारसंहितेमुळे शेतकरी कर्जमाफी लांबणीवर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र, आता या निर्णयाला आणखी विलंब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जूनअखेरपर्यंत कर्जमाफीबाबत निर्णय होईल, असे संकेत दिले होते. परंतु, विधान परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे या प्रक्रियेला ब्रेक लागण्याची शक्यता आहे.

राज्यात विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून लागू होणार आहे. निवडणूक बिनविरोध न झाल्यास ही आचारसंहिता २५ जूनपर्यंत कायम राहू शकते. राज्य सरकारने ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी जाहीर करण्याचे आश्वासन दिले होते. सहकार मंत्रालयाने यासंदर्भातील प्रस्तावही तयार केला असल्याची माहिती आहे. मात्र, निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्याने आता हा निर्णय पुढे ढकलला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागू शकते. कर्जमाफीच्या अंमलबजावणीवर आचारसंहितेचा परिणाम होऊ शकतो, असे प्रशासनातील सूत्रांचे मत आहे.

विधान परिषद निवडणुकीत महापालिका नगरसेवक, नगरपालिका आणि नगरपंचायतींचे अध्यक्ष व सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, स्वीकृत सदस्य तसेच कॅन्टोन्मेंट बोर्ड सदस्य मतदान करतात. सर्वसामान्य मतदार या प्रक्रियेत सहभागी नसल्याने सरकारला कर्जमाफीसारखा निर्णय घेण्यास कायदेशीर अडथळा नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मात्र, निवडणूक काळात असे मोठे आर्थिक आणि राजकीय निर्णय घेणे सर्वसाधारणपणे टाळले जाते. त्यामुळे सरकार शेतकरी कर्जमाफीबाबत पुढे कोणती भूमिका घेते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केलेल्या या योजनेचा लाभ राज्यातील सुमारे ३५ ते ४० लाख शेतकऱ्यांना मिळण्याची शक्यता आहे. राज्य सरकारवर अंदाजे २७ हजार कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असल्याचे सांगितले जात आहे. थकीत पीककर्जावर दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचाही प्रस्ताव आहे.

### उमर खालिदची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या न्यायालयाने जेएनयूचा माजी विद्यार्थी आणि दिल्ली दंगलीप्रकरणातील आरोपी उमर खालिद याची अंतरिम जामीन याचिका फेटाळून लावली आहे. आईच्या शस्त्रक्रियेदरम्यान तिची देखभाल करण्यासाठी खालिदने १५ दिवसांच्या अंतरिम जामिनाची मागणी केली होती. दिल्ली पोलिसांनी या जामीन अर्जाला तीव्र विरोध केला. खालिदच्या आईची शस्त्रक्रिया ही तातडीची नसल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. अंतरिम जामीन मंजूर करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कोणत्याही विशेष किंवा असाधारण परिस्थिती या प्रकरणात नसल्याचेही दिल्ली पोलिसांनी स्पष्ट केले.

## आखाती तणावाचा फटका जेएनपीएला

### हजारो कंटेनर अडकले, व्यापाऱ्यांची चिंता वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता थेट भारतातील बंदर व्यवस्थेवर दिसू लागला असून, महाराष्ट्रातील जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) परिसरात मोठ्या प्रमाणात कंटेनर अडकून पडल्याचे चित्र समोर आले आहे. आयात-निर्यात प्रक्रियेत विलंब होत असल्याने व्यापारी आणि निर्यातदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

उरण येथील जेएनपीए बंदरामध्ये हजारो कंटेनर विविध ठिकाणी उभे असल्याचे दिसून येत आहे. मालवाहतूक व्यवस्था विस्कळीत झाल्यामुळे कंटेनर वेळेत हलवले जात नसल्याची माहिती समोर आली आहे. याचा थेट फटका व्यापार क्षेत्राला बसत असून, नाशवंत माल अडकून पडल्याने कोट्यवधी रुपयांच्या नुकसानाची भीती व्यक्त केली जात आहे. अडकलेल्या कंटेनरमध्ये खाद्यपदार्थ, फळे, रसायने आणि औद्योगिक साहित्याचा मोठ्या प्रमाणात समावेश असल्याचे सांगितले जात आहे. कंटेनर क्लिअरन्स प्रक्रियेत होत असलेल्या विलंबामुळे निर्यातदार आणि आयातदार दोघांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. व्यापारी आणि निर्यातदारांनी केंद्र सरकार तसेच बंदर प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून अतिरिक्त वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

### व्हॉईस नोट्स, बनावट स्क्रीनशॉट्सद्वारे विद्यार्थ्यांची फसवणूक

# टेलिग्राम चॅनेलवर 'नीट पेपर'चा अक्षरशः बाजार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** नीट २०२६ पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात खळबळ उडालेली असतानाच आता टेलिग्राम ग्रुप्सवर 'कन्फर्म सेट' आणि 'थेट प्रवेश' मिळवून देण्याच्या जाहिरातींचा सुळसुळाट झाला आहे. परीक्षेच्या काही दिवस आधीच मूळ प्रश्नपत्रिका मिळवून देण्याचे आमिष दाखवत विद्यार्थ्यांना आणि पालकांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या ग्रुप्समध्ये केवळ मजकूर संदेशच नव्हे, तर अधिकृत वाटतील अशा व्हॉईस नोट्सचाही वापर केला जात आहे. "हा पेपर एकदम ओरिजनल आहे," असे सांगून लाखो रुपये उकळण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती समोर आली आहे.

नीट २०२६ पेपरफुटी प्रकरणाने आता देशातील सर्वात मोठ्या परीक्षा घोटाळ्याचे स्वरूप धारण केले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने तपास सीबीआयकडे सोपवला आहे. त्यानंतर सीबीआयने अनेक राज्यांत एकाचवेळी छापेमारी करत अटकसत्र सुरू केले आहे. या कारवाईत कोचिंग क्लास चालक, मध्यस्थ आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित काही संशयित व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले आहे. पुण्यातील केमिस्ट्री विषयाचे प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना या रॅकेटमधील महत्त्वाचा दुवा मानले जात असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सीमधून त्यांच्यापर्यंत प्रश्नपत्रिकेची माहिती पोहोचल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी या टेलिग्राम ग्रुप्सवर पेमेंटचे बनावट स्क्रीनशॉट्स, युपीआय व्यवहारांची कथित पुष्टी आणि अर्धवट चॅट्सचे फोटो मोठ्या प्रमाणात शेअर केले जात आहेत. व्यवहार पूर्णपणे सुरक्षित आणि खरा असल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न यातून केला जातो. विशेष म्हणजे, एका ग्रुपकडून दुसऱ्या ग्रुपला बनावट ठरवण्याचाही प्रकार सुरू आहे. "आमचाच सोर्स खरा आहे, बाकी सर्व फसवे आहेत," अशा संदेशांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

एनटीएने अशा दाव्यांना फेटाळून लावले असले, तरी अशा नेटवर्कचे अस्तित्व नाकारता येत नसल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, आरोपी व्हीपीएन तंत्रज्ञानाचा वापर करत असल्याने त्यांचा माग काढणे अत्यंत कठीण ठरत आहे. टेलिग्रामसारखे एनक्रिप्टेड प्लॅटफॉर्म असल्याने गुन्हेगारांची ओळख पटवण्यासाठी तपास यंत्रणांना संबंधित कंपन्यांच्या सहकार्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

या संपूर्ण गोंधळाचा सर्वाधिक फटका प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे. दिल्लीतील एका विद्यार्थ्याने सांगितले की, "पहिली परीक्षा चांगली गेली होती. पण आता पुन्हा परीक्षा झाली, तर ती अधिक कठीण असू शकते. आमची कोणतीही चूक नसताना ही एक प्रकारची सामूहिक शिक्षा आहे." दरवर्षी अशा प्रकारच्या अफवा आणि पेपरफुटीच्या घटना समोर येत असल्याने सोशल मीडियावरील अशा संशयास्पद हालचालींवर कायमस्वरूपी आणि कठोर देखरेख ठेवण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## नामांतर प्रकरणी हस्तक्षेपास सर्वोच्च नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'दि. बा. पाटील' यांचे नाव देण्यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावली. विमानतळाला कोणते नाव द्यायचे हा पूर्णपणे धोरणात्मक विषय असून त्यात न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. सर्वोच्च न्यायालयाने हा विषय सरकार आणि संबंधित प्राधिकरणांच्या अखत्यारीत येत असल्याचे नमूद करत नामांतराचा निर्णय पुन्हा सरकारदरबारीच असल्याचे स्पष्ट केले.

एका सामाजिक संस्थेने दाखल केलेल्या याचिकेत महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे पाठविलेल्या नामांतर प्रस्तावावर निश्चित मुदतीत निर्णय घेण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली होती. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिप्पणी करत म्हटले की, "कोणत्याही सार्वजनिक वास्तूला किंवा ठिकाणाला नाव देण्याचा अधिकार न्यायालयाचा नाही. हा विषय पूर्णपणे सरकारच्या धोरणात्मक निर्णयाशी संबंधित आहे."

सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांकडून नामांतरासाठी सुरू असलेल्या आंदोलनांचा उल्लेख करण्यात आला. त्यावर न्यायालयाने, "लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला आंदोलनाचा अधिकार आहे. मात्र, आंदोलनाचा अधिकार म्हणजे इतरांना त्रास देण्याचा अधिकार नाही," असे स्पष्ट निरीक्षण नोंदवले.

# स्वातंत्र्याचा संकोच आणि कायद्याचा सुवर्णमध्य



देशाच्या सुरक्षेचा आव आणून जेव्हा कायदे क्रूर केले जातात, तेव्हा राज्यसंस्थेच्या हाती निरंकुश सत्तेचे असे एक हत्यार मिळते, ज्याचा वापर अनेकदा कायद्याच्या रक्षणाऐवजी असहमतीचा गळा घोटण्यासाठीच अधिक होतो. 'अनलॉफुल ॲक्टिव्हिटीज प्रिव्हेंशन ॲक्ट' म्हणजेच 'युएपीए' या कायद्याचे स्वरूपही नेमके असेच बनले होते. या कायद्यातील कलम ४३-डी(५) हे तर जणू व्यक्तीला न्यायालयात उभे राहण्यापूर्वीच दोषी ठरवून, त्याला विनाचौकशी वर्षानुवर्षे अंधारकोठडीत सडवण्याचा परवानाच ठरले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका महत्त्वपूर्ण निकालात, 'युएपीए अंतर्गतही जामीन हाच नियम आणि तुरुंगवास हा अपवाद आहे' असा जो स्पष्ट निर्वाळा दिला आहे, तो देशातील कोमेजणाऱ्या लोकशाही मूल्यांना संजीवनी देणारा ठरतो. न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान आणि न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या खंडपीठाने नोंदवलेले निरीक्षण केवळ एका खटल्यापुरते मर्यादित नसून, ते राज्यसंस्थेच्या वाढत्या दडपशाहीला लावलेला एक कायदेशीर आणि घटनात्मक लगाम आहे.

आपल्या न्यायव्यवस्थेचे मूळ तत्त्व 'गुन्हा सिद्ध होईपर्यंत आरोपी निर्दोष' असे सांगते. परंतु, युएपीए सारख्या कायद्यांनी या तत्त्वालाच पूर्णपणे उलटे करून ठेवले होते. राष्ट्रीय सुरक्षेचा आणि दहशतवादाचा बागुलबुवा उभा करून तपास यंत्रणांनी न्यायालयात केवळ एक संशयास्पद कागदपत्र सादर केले, की आरोपीचा जामीन नाकारला जात असे. 'जामीन हा नियम आणि तुरुंगवास हा अपवाद' ही केवळ फौजदारी प्रक्रियेतील एक तांत्रिक ओळ नसून, तो संविधानाच्या अनुच्छेद २१ आणि २२ मधून उगम पावलेला एक अत्यंत पवित्र आणि मूलभूत अधिकार आहे, याचे स्मरण न्यायालयाने राज्यकर्त्यांना करून दिले आहे. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांच्यात संतुलन असायला हवे, परंतु सुरक्षेच्या नावाखाली स्वातंत्र्याचा संपूर्ण बळी दिला जाऊ शकत नाही, हा न्यायालयात उमटलेला सूर आजच्या राजकीय वातावरणात अत्यंत महत्त्वाचा वाटतो.

तपास यंत्रणांच्या अपयशाचा आणि संशयास्पद कार्यपद्धतीचा पर्दाफाश करण्यासाठी न्यायालयाने नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीचा घेतलेला आधार डोळे उघडणारा आहे. संसदेत सादर झालेल्या आकडेवारीनुसार, युएपीए अंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये दोषी ठरण्याचे प्रमाण केवळ दीड ते चार टक्के एवढेच नाममात्र आहे. जम्मू-काश्मीरसारख्या संवेदनशील भागात तर हे प्रमाण एका टक्क्याहूनही कमी आहे. याचाच अर्थ असा की, या कायद्याखाली अटक झालेल्या १०० पैकी ९६ ते ९८ टक्के व्यक्ती अखेर निर्दोष सुटतात. परंतु, ही सुटका होईपर्यंत त्यांची आयुष्याची पाच-दहा वर्षे तुरुंगातच संपलेली असतात. न्यायालयाचा खटला हीच त्यांच्यासाठी एक मोठी शिक्षा बनून जाते. तपास यंत्रणांचा हा 'संशयाचा न्यायशास्त्र' नागरी स्वातंत्र्याचा गळा घोटणारा ठरतो, हे स्पष्ट करताना न्यायालयाने केवळ कायद्याची भाषा बोलली नाही, तर संविधानाचा आत्मा जिवंत ठेवला आहे.

या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाने उमर खालीद आणि शर्जिल इमाम यांच्या जामीन अर्जावर पूर्वीच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयाबाबत व्यक्त केलेली नाराजी विशेष दखलपात्र ठरते. आरोपीला वर्षभर जामीन मागण्यापासूनच रोखणे म्हणजे संविधानाने दिलेल्या जीवन आणि स्वातंत्र्याच्या अधिकारावरच गदा आणण्यासारखे होते. 'के. ए. नजीब' खटल्याचा संदर्भ देत न्यायालयाने हे पुन्हाधोरेखित केले आहे की, केवळ कायद्यात कडक अटी आहेत म्हणून न्यायालय नागरिकांच्या मूलभूत हक्कांकडे पाठ फिरवू शकत नाही. तपास यंत्रणा वर्षानुवर्षे आरोप निश्चित करू शकत नाहीत, तेव्हा एखाद्या व्यक्तीला तुरुंगात डांबून ठेवणे ही कायदेशीर कोठडी नसून तो अनधिकृत छळ ठरतो. सुसंस्कृत आणि कायद्याचे राज्य असलेल्या समाजात असहमती किंवा निषेधाचा अधिकार हा दहशतवाद मानला जाऊ शकत नाही. सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवर टीका करणे, रस्त्यावर उतरून शांततापूर्ण आंदोलन करणे किंवा केवळ विशिष्ट विचारसरणी बाळगणे म्हणजे देशाविरुद्ध युद्ध पुकारणे नव्हे, हा फरक तपास यंत्रणा विसरतात. सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणारे तोंड बंद करणे हाच या कायद्याच्या गैरवापरामागील मुख्य हेतू असतो. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता कनिष्ठ न्यायालयांनाही युएपीएच्या खटल्यांमध्ये निर्णय घेण्याचे बळ मिळेल. कायद्याची दहशत ही नागरिकांवर नसून, गुन्हेगारांवर असायला हवी. संविधानाने दिलेले स्वातंत्र्य हे राज्याच्या सत्तेपेक्षा नेहमीच श्रेष्ठ राहील, हा सुवर्णमध्य या निकालाने पुन्हा एकदा प्रस्थापित केला आहे.

**» युएपीए कायद्यातील जामीनबंदी नागरिकांच्या मूलभूत अधिकारांपेक्षा मोठी असू शकत नाही, हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा कायद्याच्या नावाखाली चालणाऱ्या अमर्याद सत्तेला वेसण घालणारा ठरला आहे.**

## संपादकीय

### सवलतींची रेवडी आणि अर्थशास्त्राचा पंचनामा



**केरळमधील नवनियुक्त यूडीएफ सरकारने महिलांना मोफत बस प्रवासाची पहिली 'इंदिरा गॅरंटी' लागू केली खरी; मात्र सुमारे साडेचार लाख कोटींच्या कर्जाखाली दबलेली राज्याची तिजोरी आणि परिवहन मंडळाची दुरवस्था पाहता, लोकप्रिय घोषणा आणि कठोर आर्थिक वास्तव यातील दरी या निर्णयाने पुन्हा एकदा चव्हाट्यावर आणली आहे.**

राजकारणात जनमानसाला भुरळ घालणाऱ्या घोषणा करणे आणि सत्तेवर आल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करताना अर्थशास्त्राच्या कठोर भिंतीला धडकणे, हा भारतीय लोकशाहीतील एक जुना आणि परिचित खेळ आहे. केरळमध्ये नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसप्रणित यूडीएफ आघाडीने सत्ता हस्तगत केली. मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांनी पदभार स्वीकारताच पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत महिलांसाठी सरकारी बस प्रवासाची मोफत योजना जाहीर करून लोकप्रियतेचा पहिला चौका मारला. कर्नाटक आणि तामिळनाडूच्या धर्तीवर घेतलेला हा निर्णय वरकरणी 'महिला सक्षमीकरण' आणि 'सामाजिक न्याय' या गोंडस नावाखाली खपवला जात असला, तरी केरळच्या विशिष्ट भौगोलिक आणि आर्थिक चौकटीत हा सुवर्णमध्य ठरणार की आर्थिक दिवाळखोरीचे नवे निमंत्रण, याचा गंभीर वेध घेणे गरजेचे आहे. राज्यसंस्थेने जेव्हा जेव्हा लोकानुनयाचा मार्ग निवडला आहे, तेव्हा तेव्हा तिने दीर्घकालीन वित्तीय आरोग्याचा बळी दिला आहे, हा इतिहास आहे. या योजनेच्या केंद्रस्थानी असलेल्या केरळच्या आर्थिक स्थितीचा पंचनामा केला, तर अत्यंत धक्कादायक वास्तव समोर येते. आज केरळ राज्यावर सुमारे ४ लाख २५ हजार कोटी रुपयांहून अधिकचे महाप्रचंड कर्ज आहे. राज्याचे कर्ज आणि सकल राज्य उत्पन्न यांचे गुणोत्तर जवळपास ३७ टक्क्यांच्या वर गेले आहे, जे कोणत्याही राज्यासाठी धोक्याची घंटा मानली जाते. रिझर्व्ह बँकेने वारंवार धोक्याचा इशारा देऊनही आणि केंद्रासोबत कर्जमर्यादेवरून सर्वोच्च न्यायालयापर्यंत वाद घालूनही केरळच्या राज्यकर्त्यांचे डोळे उघडलेले नाहीत. ज्या राज्याला दैनंदिन खर्च चालवण्यासाठी, कर्मचाऱ्यांचे पगार आणि निवृत्तीवेतन देण्यासाठी दरमहा खुल्या बाजारातून नवे कर्ज उभे करावे लागते, त्या राज्याने अशा प्रकारे कोट्यवधी रुपयांची नवी 'रेवडी' वाटणे म्हणजे निव्वळ आत्मघातकीपणा आहे. केरळ राज्य मार्ग परिवहन महामंडळ ही संस्था तर आधीच मृत्यूशय्येवर पडलेली रुग्ण आहे. आता सरकारच्या या 'मोफत प्रवासाचा' वार्षिक कोट्यवधी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा या कफल्लक महामंडळाच्या खांद्यावर टाकण्यात आला आहे. या योजनेच्या अंमलबजावणीतील सर्वात मोठा तांत्रिक आणि व्यावहारिक अडथळा म्हणजे केरळमधील सार्वजनिक वाहतुकीचे वेगळेपण. शेजारील राज्ये जसे की कर्नाटक किंवा तामिळनाडूमध्ये सरकारी बसेसचे जाळे प्रचंड मोठे आहे आणि खासगी बसेसचे प्रमाण नगण्य आहे. केरळमध्ये चित्र उलटे आहे. येथे खासगी बस चालकांची संख्या सरकारी बसेसच्या तुलनेत कित्येक पटीने जास्त असून, ग्रामीण आणि निमशहरी भागातील दळणवळणाची संपूर्ण धुरा याच खासगी वाहतुकीवर अवलंबून आहे. आता सरकारने केवळ 'केएसआरटीसी' बसेसमध्ये मोफत प्रवास दिल्यामुळे, महिला प्रवाशांची मोठी गर्दी सरकारी गाड्यांकडे वळणार हे उघड आहे. यामुळे आधीच तोट्यात चालणाऱ्या खासगी बस चालकांचे कंबरडे मोडणार आहे. खासगी क्षेत्राला विश्वासात न घेता केवळ राजकीय इर्षेपोटी घेतलेला हा निर्णय संपूर्ण राज्याची वाहतूक व्यवस्था कोलमडवून टाकण्यास कारणीभूत ठरू शकतो. केरळसारख्या राज्यामध्ये, जिथे साक्षरतेचे आणि महिलांच्या सामाजिक जाणिवांचे प्रमाण देशात सर्वोच्च आहे, तिथे महिलांना प्रवासाच्या तिकिटावर सवलत देण्यापेक्षा त्यांच्यासाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे आणि राज्यातील उद्योगधंद्यांची घसरण थांबवणे अधिक गरजेचे होते. परंतु, दीर्घकालीन विकासाचे प्रकल्प राबवण्यापेक्षा दरमहा मोफत तिकिट फाडणे राजकीयदृष्ट्या नेहमीच सोयीचे आणि फायद्याचे ठरते. सव्वाचार लाख कोटींचे कर्ज डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या केरळचे नवे सरकार 'आम्ही दिलेला शब्द पाळला' असा ढोल वाजवू शकते. मात्र, जेव्हा काही महिन्यांनी डिझेलचे पैसे भरायला पैसे नसतील किंवा कर्मचाऱ्यांचे संप सुरू होतील, तेव्हा या मोफत प्रवासाचा खरा फटका याच महिलांना आणि सर्वसामान्य जनतेला सोसावा लागेल. हा निर्णय म्हणजे अर्थशास्त्राच्या नियमांना दिलेले उघड आव्हान आहे. मुख्यमंत्र्यांनी घेतलेला हा निर्णय भविष्यात तो राज्याला आर्थिक विवंचनेच्या खोल गर्तेत ढकलणारा ठरेल, यात शंका नाही.

# शहरात अनधिकृत बांधकामांना आणि अतिक्रमणांना थारा नाही

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामांना आणि अतिक्रमणांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. अशा प्रकारांवर तातडीने कठोर कारवाई करावी, तसेच अतिक्रमण हटवून मोकळ्या झालेल्या जागांवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी त्या ठिकाणी मुलांसाठी खेळाची मैदाने आणि हरित क्षेत्र विकसित करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.



महापालिकेच्या सर्व विभागप्रमुखांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयुक्त कार्यालयात डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत शहरातील विकासकामे, पावसाळ्यापूर्व तयारी, अतिक्रमण नियंत्रण, नालेसफाई तसेच विविध विभागांमधील समन्वयाचा आढावा घेण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, सहआयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहशहर अभियंता बापू गायकवाड, अजय सूर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, सिताराम बहुरे यांच्यासह अ, ब, क, ड, ई, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांचे अधिकारी ऑनलाइन सहभागी झाले होते.

शहराच्या नियोजनावर परिणाम करणारी बेकायदा बांधकामे वेळेत रोखली गेली नाहीत, तर भविष्यात गंभीर नागरी समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात नियमित पाहणी करून नव्याने सुरू होणाऱ्या बांधकामांवर बारकाईने लक्ष ठेवावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले. अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकाम आढळताच कोणतीही दिरंगाई न करता तत्काळ कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले.

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी नालेसफाईची कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या. संवेदनशील भागांमध्ये विशेष लक्ष ठेवून नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करावी, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले.

नाल्यांच्या प्रवाहात अडथळा निर्माण करणारी अतिक्रमणे तातडीने हटवून पाण्याचा नैसर्गिक निचरा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही डॉ. सूर्यवंशी यांनी दिल्या.

बैठकीत शहरातील पाणी चोरी रोखण्यासाठी उपाययोजना, विविध भागांतील पाणी समस्यांचे निराकरण, कामगार कट्ट्यांचे नियोजन, संभाव्य पूर व्यवस्थापन, उद्यानांची देखभाल, रस्त्यांच्या दुभाजकांमधील वृक्षसंवर्धन तसेच रस्ता रुंदीकरणाच्या कामांचाही आढावा घेण्यात आला. संबंधित कामांमधील त्रुटी दूर करून अधिक समन्वयाने आणि जबाबदारीने काम करण्याच्या सूचनाही संबंधित विभागप्रमुख आणि अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

# पावसाळ्यापूर्वी महत्त्वाची कामे पूर्ण करण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारत आणि डेअरी फार्म रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पांतर्गत सुरू असलेली पावसाळ्यापूर्वीची सर्व महत्त्वाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. विशेषतः रस्त्यांचे डांबरीकरण, पाणी निचरा व्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित कामांवर भर द्यावा, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी दिले.

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी पिंपरी येथील नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाची तसेच डेअरी फार्म परिसरातील रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांचा सविस्तर आढावा घेतला.

या पाहणीदरम्यान मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, कार्यकारी अभियंता विजय भोजने, संध्या वाघ तसेच उपअभियंते, कनिष्ठ अभियंते आणि संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. नवीन प्रशासकीय इमारतीमुळे महापालिकेची विविध कार्यालये एकाच छताखाली येणार असून नागरिकांना अधिक वेगवान, सुलभ आणि आधुनिक सेवा उपलब्ध होणार आहेत. प्रकल्पाच्या गुणवत्तेबाबत तडजोड न करता कामे पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

# खेळाडूंना सुविधा देण्यासाठी पालिका प्रयत्नशील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील खेळाडू विविध क्रीडा प्रकारांमध्ये सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत असून शहराची क्रीडा परंपरा अधिक बळकट करत आहेत. महापालिकेच्या माध्यमातून खेळाडूंना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असून आगामी काळात अधिकाधिक युवक-युवतींनी क्रीडा क्षेत्रात पुढे यावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आयोजित जिल्हास्तरीय एथलेटिक्स स्पर्धेत पिंपरी-चिंचवडमधील साई स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदके पटकावली. या खेळाडूंचा सन्मान महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नगरसदस्य सुरेश भोईर, सदाशिव खाडे तसेच प्रशिक्षक चंद्रशेखर कुदळे उपस्थित होते. मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. स्पर्धेत मधुरा खांबे हिने लांब उडी आणि तिहेरी उडी या दोन्ही प्रकारांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदके पटकावली. समृद्धी भोईर हिने हेप्टॅथलॉन या बहुप्रकारांच्या कठीण स्पर्धेत सुवर्णपदक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. तर प्राची अंधारे हिने २० हजार मीटर रेस वॉकिंग स्पर्धेत दमदार प्रदर्शन करत सुवर्णपदकाची कमाई केली. या तिन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच आगामी स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# भोसरी ओव्हर ब्रिजवर अपघात; दुचाकीस्वाराचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** भोसरी ओव्हर ब्रिजवर भरधाव दुचाकीचा भीषण अपघात होऊन एका युवकाचा मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले. ही घटना १७ मे २०२६ रोजी मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रसाद बाळू गायकवाड (वय २९, रा. वडगाव पाटोळे, ता. खेड, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रसाद गायकवाड, त्यांचा मित्र दिनेश ओव्हाळ आणि राहुल शंकर लगाडे (वय ३०, रा. खेड, पुणे) हे तिघेजण दुचाकीवरून खेडहून नाशिक फाटा, भोसरी मार्गे जात होते. त्यावेळी राहुल लगाडे हा एमएच-१४-एमएक्स-६२७६ क्रमांकाची दुचाकी भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे चालवत होता.

वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करत त्याने भोसरी ओव्हर ब्रिजवरील डिव्हायडरला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात प्रसाद गायकवाड यांचा हात फ्रॅक्चर झाला असून दिनेश ओव्हाळ गंभीर जखमी झाले आहेत. तर दुचाकी चालवत असलेला राहुल लगाडे याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी भोसरी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), १२५(१), १२५(२) आणि २८१ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लबडे करत आहेत.

**गोवंशाची क्रूर वाहतूक उघड**

**पुणे :** देहूरोड परिसरात गोवंशाची अमानुष पद्धतीने वाहतूक करणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली असून चार गोवंशांची सुटका करण्यात आली आहे. याप्रकरणी देहूरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास शितळादेवी मंदिरासमोर देहूरोड येथे एमएच-१२-एसवाय-०९०७ क्रमांकाच्या टेम्पोमधून गोवंशांची क्रूर पद्धतीने वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संबंधित वाहन ताब्यात घेतले. या कारवाईत योगेश धनराज द्रविड (वय ३६), स्वप्निल बरनाबोस मुनगंडा (वय २६) आणि सूर्यभान झेंडे (वय २८, सर्व रा. शितळानगर क्रमांक १, देहूरोड) यांना अटक करण्यात आली. तपासादरम्यान आरोपींनी चार गोवंशांना दोऱ्यांनी बांधून अत्यंत कमी जागेत कोंबले असल्याचे आढळून आले. तसेच जनावरांना चारा आणि पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता त्यांना कत्तलीसाठी नेले जात असल्याचेही समोर आले.

या प्रकरणी महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६ तसेच प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास देहूरोड पोलीस करत आहेत.

**किरकोळ वादातून मारहाण**

**पुणे :** खेड तालुक्यातील करंजविहिरे गावाजवळील एका हॉटेलमध्ये किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून मारहाणीची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांनाही पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना १६ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास करंजविहिरे येथील साई सिद्धी हॉटेलमध्ये घडली. याबाबत ममता योगेश कोळेकर (वय २८, रा. करंजविहिरे, ता. खेड) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शांताराम धोंडीबा नवले (वय ४१) आणि दिनेश ज्ञानेश्वर जाधव (वय ३९, दोघे रा. वाहगाव, ता. खेड) हे हॉटेलमध्ये शिवीगाळ करत होते.

फिर्यादींनी त्यांना शिवीगाळ न करण्यास सांगत हॉटेलमधून बाहेर जाण्यास सांगितले. याचा राग आरोपींनी मनात धरला. यानंतर आरोपींनी फिर्यादींना शिवीगाळ करत त्यांच्या पतीवर काचेच्या बाटलीने हल्ला केला. डोक्यावर, मानेवर आणि कंबरेवर वार करून त्यांना गंभीर जखमी करण्यात आले. तसेच जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी उत्तर महाळुंगे पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# पार्किंगच्या वादातून दुकानदाराला मारहाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** केळगाव येथे दुकानासमोर वाहन पार्किंग करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून नऊ जणांच्या टोळक्याने दुकानदार, त्याचा भाऊ आणि इतरांना मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी आळंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. ही घटना १७ मे रोजी दुपारी केळगाव, ता. खेड येथे घडली. याबाबत सोमनाथ हनुमंत मुंगसे (वय ४८, रा. केळगाव) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमनाथ मुंगसे हे त्यांच्या 'गुरुकृपा प्रोव्हिजन स्टोअर्स' या किराणा दुकानात काम करत असताना काही जण चारचाकी वाहनातून तेथे आले. त्यांनी दुकानासमोर वाहने उभी केली. यावेळी फिर्यादींनी तेथे पार्किंगसाठी जागा नसल्याचे सांगितल्याने आरोपी संतापले.

आरोपींनी शिवीगाळ करत "हा रस्ता तुझ्या बापाचा आहे का?" असे म्हणत फिर्यादीला मारहाण केली. त्यानंतर फिर्यादीचा भाऊ अजय मुंगसे हा वाद मिटवण्यासाठी आला असता आरोपींपैकी एकाने प्लास्टिकच्या पाईपने त्याच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर वार केला. या हल्ल्यात तो जखमी झाला. तसेच इतर दोघांनाही दगड फेकून मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### खडकवासलाच्या पाण्यासाठी रास्ता रोको

**भिगवण :** भिगवण परिसरात खडकवासला कालव्याचे आवर्तन तातडीने सुरू करण्याच्या मागणीसाठी करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलनानंतर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. शासनाकडून आंदोलनास परवानगी नाकारण्यात आलेली असतानाही पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ठिय्या आंदोलन करण्यात आल्याने ११ प्रमुख नेत्यांसह सुमारे २०० ते २५० अनोळखी आंदोलकांवर भिगवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी चर्चा सुरू झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला खडकवासला कालव्याचे पाणी सोडण्याच्या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलनाचे निवेदन दिले होते. मात्र, महामार्गावरील वाहतूक कोंडी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी आंदोलनास अधिकृत परवानगी नाकारली होती. तरीही सोमवारी सकाळपासून डाळज नंबर २ परिसरात शेतकरी मोठ्या संख्येने जमा होऊ लागले. सकाळी साडेदहा वाजेपर्यंत आंदोलनकर्त्या नेत्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान, जलसंपदा विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल होऊन आंदोलकांशी चर्चा केली; मात्र अधिकाऱ्यांच्या आश्वासनांवर शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. यानंतर आंदोलक अधिक आक्रमक झाले आणि महामार्ग रोखण्याचा निर्णय घेण्यात आला. सकाळी साडेदहा ते साडेअकरा या कालावधीत सुमारे २०० ते २५० आंदोलकांनी पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही लेन तसेच सर्व्हिस रोडवर ठिय्या आंदोलन केले. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक संपूर्णपणे ठप्प झाली. अनेक वाहनांच्या रांगा लागल्या असून प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. पोलिसांच्या मते, आंदोलकांनी वाहने अडवून नागरिकांच्या मुक्त प्रवासाच्या अधिकारात अडथळा निर्माण केला. भिगवण पोलीसचे पोलीस उपनिरीक्षक नाना वीर यांनी फिर्याद दिली आहे.

## सुनेत्रा पवार यांना दिलीप मोहिते पाटील यांचे निवेदन

# भीमाशंकरच्या नामउल्लेखावरून नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** श्रीक्षेत्र भीमाशंकरच्या संदर्भात "खेड-आंबेगाव" असा उल्लेख करण्याच्या प्रस्तावाला विरोध दर्शवत खेड तालुक्याचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांना मंगळवारी निवेदन दिले. यावेळी शरद बुट्टे पाटील, कैलास सांडभोर, अरुण चांभारे, जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे, समीर सुपे, माजी सभापती सुरेश शिंदे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात मोहिते पाटील यांनी म्हटले आहे की, श्रीक्षेत्र भीमाशंकर हे खेड तालुक्याचे श्रद्धास्थान आणि ओळखीचे प्रतीक आहे. माजी आमदार स्वर्गीय नारायणराव पवार यांनी यासाठी सातत्याने संघर्ष केला होता. तसेच आपण आमदार असतानाही भीमाशंकर हे खेड तालुक्याचाच अविभाज्य भाग



राहावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत आंबेगावच्या लोकप्रतिनिधींनी "भीमाशंकर खेड-आंबेगाव" असा उल्लेख करण्याची सूचना केल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांनीही या सूचनेला मान्यता दिल्याची माहिती समोर आल्याने खेड तालुक्यात नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

शासन स्तरावर अधिकृत कार्यवृत्त तयार होणार असल्याने "खेड-आंबेगाव" असा उल्लेख झाल्यास भविष्यात खेड तालुक्याच्या अस्मितेवर परिणाम होऊ शकतो. "आज खेड-आंबेगाव आणि उद्या खेड हे नावच मागे पडेल," अशी भीती जनमानसात असल्याचे मोहिते पाटील यांनी निवेदनात नमूद केले आहे. स्थानिक जनभावना, इतिहास आणि वास्तव लक्षात घेऊन शिखर समितीच्या कार्यवृत्तात "भीमाशंकर खेड-आंबेगाव" ऐवजी केवळ "भीमाशंकर खेड" असाच उल्लेख ठेवण्यात यावा, अशी मागणी त्यांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, श्रीक्षेत्र भीमाशंकर हे ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध असून ते खेड तालुक्यात असल्याचे सांगत या नामउल्लेखाच्या मुद्द्यावरून खेड आणि आंबेगाव तालुक्यांमध्ये दीर्घकाळापासून मतभेद आणि चर्चा सुरू असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनामुळे खेड तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

## भीमाशंकर संदर्भात विरोधकांकडून दिशाभूल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** भीमाशंकर मंदिर आणि विकास आराखड्याच्या संदर्भात विरोधकांकडून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप करत खेडचे आमदार बाबाजी काळे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "विरोधक एक वाक्य पकडून त्याचा विपर्यास करत आहेत. त्यांना विकासाशी काही देणेघेणे नसून केवळ टीका करण्याची संधी हवी आहे. अशा टीकेला आम्ही भीक घालत नाही," असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.

श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखड्यात तालुक्याच्या उल्लेखावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर आमदार काळे यांनी खुलासा केला. "भीमाशंकर मंदिर हे शंभर टक्के खेड तालुक्यात आहे. यापूर्वी विधानसभेतही मी ही भूमिका ठामपणे मांडली होती," असे त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीच्या नोटिफिकेशनमध्ये "टप्पा क्रमांक १ - श्री क्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा ता. आंबेगाव सह खेड, जिल्हा पुणे (रु. १४८.३७ कोटी)" असा उल्लेख करण्यात आला होता. यावर १८ मे रोजी झालेल्या ऑनलाइन बैठकीत आमदार बाबाजी काळे यांनी आक्षेप घेत "विकास आराखड्यात प्रथम खेड तालुक्याचा आणि नंतर आंबेगाव तालुक्याचा उल्लेख व्हावा," अशी मागणी केली. माजी मंत्री दिलिप वळसे पाटील यांनीही भीमाशंकर मंदिर खेड तालुक्यात असल्याचे मान्य केल्याचा व्हिडिओ पुरावा असल्याचा दावा काळे यांनी केला. विकास आराखड्यातील काही कामे दोन्ही तालुक्यांत विभागली गेल्यामुळे "आंबेगाव सह खेड" असा उल्लेख करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "हा विषय केवळ विकास आराखड्यापुरता मर्यादित असून मंदिराच्या स्थानाबाबत कोणताही संभ्रम नाही," असेही त्यांनी सांगितले.

## बिबट्यांच्या अधिवासात वासरे मोकाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात शेतकऱ्यांकडून जर्सी गायींची नर वासरे मोठ्या प्रमाणावर मोकाट सोडली जात असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे बिबट्यांचा मुक्त संचार असलेल्या वनहद्दी आणि मळ्यांच्या परिसरात ही वासरे सोडली जात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागापूर परिसरातील ढोले मळा, मिंडे मळा तसेच खडकी गावालगतच्या वनक्षेत्रात अनेक जर्सी वासरे दिवसेंदिवस भटकताना दिसत आहेत. दिवसभर ही वासरे रस्त्यांवर आणि मळ्यांमध्ये फिरत असतात. अनेकदा त्यांच्या हंबरण्यामुळे बिबट्यांचे लक्ष वेधले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या भागात बिबट्यांचा वावर आणखी वाढण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बिबट्यांचे दर्शन, पाळीव



प्राण्यांवरील हल्ले तसेच नागरिकांवर झडप घालण्याच्या घटना वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत मोकाट वासरे बिबट्यांसाठी सहज भक्ष्य ठरत असल्याने वन्यप्राण्यांचा मानवी वस्त्यांकडे वावर वाढत असल्याचे जाणकारांचे मत आहे.

पूर्वी शेतीकामासाठी बैलजोडीचा वापर होत असल्याने नर वासरांचे संगोपन केले जात होते. मात्र आधुनिक शेतीकरणामुळे बैलांचा वापर कमी झाला आहे. परिणामी अनेक शेतकरी जर्सी गायींची नर वासरे सांभाळण्याऐवजी मोकाट सोडत असल्याचे चित्र आहे. ही वासरे नंतर जंगल परिसर, मळे आणि रस्त्यांच्या कडेला फिरताना आढळतात.

दरम्यान, वनविभाग आणि ग्रामपंचायतीने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, मोकाट जनावरांच्या व्यवस्थापनासाठी ठोस उपाययोजना कराव्यात तसेच बिबट्यांच्या अधिवासालगत वासरे सोडण्यावर नियंत्रण आणावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## जनाई-शिरसाईला पाणीटंचाईचा फटका

### लाभक्षेत्रातील अनेक गावांसमोर गंभीर पाणीटंचाईचे संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** भीषण उन्हाळा, कोरडी पडलेली शेते आणि पाण्यासाठी हवालदिल झालेले शेतकरी अशा परिस्थितीत जलसंपदा विभागाच्या नियोजनशून्य कारभाराचा मोठा फटका जनाई आणि शिरसाई उपसा सिंचन योजनांना बसला आहे. नियोजित प्रमाणात पाणी न सोडल्याने लाभक्षेत्रातील अनेक गावे गंभीर पाणीटंचाईला सामोरी जात असून शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

खडकवासला कालव्यातून जनाई उपसा सिंचन योजनेसाठी वरवंड (ता. दौंड) येथील तलावात, तर शिरसाई योजनेसाठी शिर्सुफळ तलावात पाणी सोडण्यात येते. यंदाच्या उन्हाळी आवर्तनासाठी सुरुवातीला जनाई योजनेसाठी ३२५ दशलक्ष घनफूट आणि शिरसाईसाठी २२५ दशलक्ष घनफूट पाणी उचलण्याचे नियोजन



करण्यात आले होते. मात्र, मार्च महिन्यात पुण्याजवळ कालवा फुटल्याच्या घटनेनंतर हे प्रमाण कमी करण्यात आले. त्यानुसार जनाईसाठी ३०० दशलक्ष घनफूट आणि शिरसाईसाठी २०० दशलक्ष घनफूट पाणी मंजूर करण्यात आले.

उपसा सिंचन विभागाने त्यानुसार पाणीवाटपाचे नियोजन केले होते. मात्र, खडकवासला पाटबंधारे विभागाकडून अपेक्षित प्रमाणात पाणीच सोडण्यात आले नाही. त्यामुळे दोन्ही योजना अडचणीत आल्या. प्रत्यक्षात जनाई योजनेसाठी सुमारे १९० दशलक्ष घनफूट, तर शिरसाईसाठी १७० दशलक्ष घनफूटच पाणी उपलब्ध झाल्याची माहिती समोर आली आहे.

खडकवासला पाटबंधारे विभागाकडून जनाईसाठी ३५५ दशलक्ष घनफूट आणि शिरसाईसाठी २४४ दशलक्ष घनफूट पाणी सोडल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र, कालव्यातून आणि साठवण तलावांत स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात पाणी उपसा, विविध पाणीपुरवठा योजनांसाठी पाणी वळविणे, तसेच बाष्पीभवन आणि जमिनीत झिरपणाऱ्या पाण्यामुळे योजनांना अपेक्षित पाणी मिळाले नसल्याचे सांगितले जात आहे.

जनाई उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील बारामती तालुक्यातील नारोळी, दंडवाडी, काळखैरेवाडी, राजबाग खैरेपडळ, आंबी खुर्द, बोरकरवाडी, कुतवळवाडी, चांदगुडेवाडी आणि पानसरेवाडी या गावांसह सुपे परिसरातील तलावांना पुरेसे पाणी मिळालेले नाही. तसेच दौंड तालुक्यातील जिरेगाव, वासुंदे, रोटी आणि पुरंदर तालुक्यातील राजुरी, रिसे, खोर या गावांनाही योजनेचे पाणी पोहोचले नसल्याचे समोर आले आहे.

शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील अंजनगाव, जळगाव सुपे, सोनवडी सुपे आणि उंडवडी कडेपठार परिसरात गंभीर पाणीटंचाई निर्माण झाली आहे. विशेषतः अंजनगाव आणि जळगाव सुपे या गावांना अपेक्षित प्रमाणात पाणी मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. आधीच दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणीत विभागाच्या हलगर्जीपणामुळे आणखी भर पडल्याची भावना व्यक्त होत आहे. पाण्यावर अवलंबून असलेली पिके धोक्यात आली असून अनेक शेतकऱ्यांसमोर उभ्या पिकांचे अस्तित्व टिकविण्याचे संकट निर्माण झाले आहे.

## उन्हात राबलेले शेतमजूर परतीच्या वाटेवर



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात यंदाचा उन्हाळा अत्यंत तीव्र ठरल्याने शेतीकामासाठी परजिल्ह्यांतून आलेल्या शेतमजुरांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. कडक उन्हात दिवसभर राबून विविध शेतीकामे पूर्ण करणाऱ्या मजुरांनी यंदाचा उन्हाळा आयुष्यातील सर्वात कठीण असल्याची भावना व्यक्त केली.

"दिवसभर उन्हात काम करताना प्रचंड त्रास सहन करावा लागला. कामाचे पैसे चांगले मिळाले, मात्र आजारपणावरही मोठा खर्च झाला. सोबत आणलेल्या लहान मुलांचेही हाल झाले," असे सांगताना अनेक शेतमजूर भावूक झाले. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील कांदा काढणीची कामे पूर्ण झाली असून कांदे बराकीत भरून ठेवण्यात आले आहेत. उन्हाळी बाजरी काढणीची कामेदेखील अंतिम टप्प्यात आली आहेत. त्यामुळे आता शेतमजुरांच्या हाताला काम उपलब्ध होत नसल्याने ते आपल्या मूळ गावी परतू लागले आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून कुटुंबासह वास्तव्यास असलेल्या या मजुरांनी उन्हातान्हात मेहनत करून शेतकऱ्यांची शेतीकामे पूर्ण केली. मात्र कामे संपल्याने आणि वाढत्या उष्णतेमुळे आता त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला आहे.

## तिन्हेवाडी सोसायटीच्या अध्यक्षपदी प्रा. कविता पाचारणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** तिन्हेवाडी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी गावच्या माजी सरपंच प्रा. कविता कोंडीभाऊ पाचारणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळत्या अध्यक्ष प्रतीक्षा पाचारणे यांनी राजीनामा दिल्यानंतर ही निवड प्रक्रिया पार पडली.

अध्यक्षपदाच्या निवडीसाठी खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात अध्यासी अधिकारी सुभद्रा मारुती बगाटे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी अध्यक्ष भास्करराव जगदाळे, राजेंद्र पाचारणे, प्रतीक्षा पाचारणे, शिवाजी आरुडे, मधुकर सांडभोर, पोपट आरुडे, विजय सांडभोर आणि कमल पाचारणे उपस्थित होते. अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत प्रा. कविता पाचारणे यांचा एकमेव अर्ज प्राप्त



झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती बगाटे यांनी त्यांची बिनविरोध निवड घोषित केली. बाजार समितीचे सभापती तथा जिल्हा परिषदेचे गटनेते अ‍ॅड. विजयसिंह शिंदे पाटील, उपसभापती क्रांतीताई सोमवंशी, माजी उपसभापती अशोक राक्षे तसेच सहकारी संचालक व जिल्हा परिषदेचे माजी सभापती शरद बुट्टे पाटील यांनी प्रा. कविता पाचारणे यांचे अभिनंदन केले. बिनविरोध निवडीसाठी बिजली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पी.टी. आरुडे, संतोष पाचारणे, उपसरपंच रंगनाथ आरुडे, स्वप्नील ढोरे, भगवान पाचारणे, शेखर पाचारणे आणि प्रशांत पाचारणे यांनी विशेष प्रयत्न केले.

## समाज विकास नाट्यमंडळाचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावात गेली तब्बल ८० वर्षे अखंडपणे नाट्यपरंपरा जपणाऱ्या समाज विकास नाट्यमंडळाला पुणे येथील कलासारथी कला मंच यांच्या वतीने "नाट्य गौरव सन्मान-२०२६" पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे रांजणी गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

घोडेगाव येथील पृथ्वी लॉन्स कार्यालयात आयोजित पुणे जिल्हास्तरीय भव्य कलावंत मेळाव्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांच्या हस्ते समाज विकास नाट्यमंडळाला सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिबीशन चौरे, बालगंधर्व परिवाराचे सचिव अण्णासाहेब



गुंजाळ, बालरंगभूमी परिषदेच्या जिल्हाध्यक्ष दिपाली शेळके तसेच वरिष्ठ अधिकारी निलेश धुमाळ उपस्थित होते. समाज विकास नाट्यमंडळाचे कलाकार बाळकृष्ण भोर, अविनाश वाघ, संतोष वाघ आणि गणेश वाघ यांनी हा सन्मान स्वीकारला.

रांजणी गावात समाज विकास नाट्यमंडळाच्या माध्यमातून गेल्या आठ दशकांपासून नाट्यपरंपरा जतन केली जात आहे. ग्रामदैवत नरसिंह महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त दरवर्षी विविध समाजप्रबोधनपर नाटके सादर केली जातात. कौटुंबिक, ऐतिहासिक आणि धार्मिक विषयांवरील नाटकांद्वारे समाजाला सकारात्मक संदेश देण्याचे कार्य मंडळ सातत्याने करत आहे.

ग्रामीण भागात नाट्यकलेची परंपरा जपत प्रभावी समाजप्रबोधन केल्याबद्दल कलासारथी कला मंच, पुणे यांनी समाज विकास नाट्यमंडळाची दखल घेत हा सन्मान प्रदान केला. या गौरवाबद्दल रांजणी ग्रामस्थांनी नाट्यमंडळातील कलाकार आणि पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

## पुनर्वसन आणि सर्वांगीण विकासासाठी

# भीमाशंकर प्रकल्पासाठी विकास आराखड्याचे सादरीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरूनगर :** श्रीक्षेत्र भीमाशंकर गावाच्या पुनर्वसन आणि सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या "श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श ग्राम प्रकल्प विकास आराखडा" संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे शिखर समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला आमदार बाबाजी काळे हे दृक्प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

बैठकीत भीमाशंकर परिसरातील



वाढती भाविक संख्या, वाहतूक कोंडी, पर्यावरण संवर्धन तसेच मूलभूत सुविधांच्या उभारणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सुमारे १७२.२२ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. या आराखड्यात निवासी गाळे, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य केंद्र, शाळा, स्वच्छता सुविधा, हेरिटेज मार्केट, सौरऊर्जा प्रकल्प तसेच मंदिर परिसर विकास अशा विविध कामांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच रस्ते विकास, रोपवे प्रकल्प, वीजपुरवठा आणि पर्यटन सुविधांबाबत संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

दरम्यान, आमदार बाबाजी काळे यांनी खेड तालुक्याच्या विकासासाठी काही महत्त्वपूर्ण मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडल्या. तळेगाव–आंबी– करंजविहिरे–धामणेफाटा– पाईट–पाळू–आडगाव सातकरवाडी मार्गे धामणगाव व शिरगावपर्यंत रस्ता जोडण्याची मागणी त्यांनी केली. तसेच करंजविहिरे–शिवे–गडद मार्गे भीमाशंकरला रस्ता जोडण्याचा प्रस्ताव समाविष्ट करावा, अशी मागणीही करण्यात आली.

याशिवाय, शिक्रापूर–भीमाशंकर मार्गावरील पाबळ ते कनेरसर सेझ दरम्यानच्या सुमारे १० किलोमीटर रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणीही करण्यात आली. भीमाशंकरजवळील पदरवाडी येथील १६ घरांचे पुनर्वसन नवीन भीमाशंकरवाडी आराखड्यात करण्यात यावे, अशी मागणीही आमदार काळे यांनी केली. या मागण्यांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना तत्काळ दखल घेण्याचे निर्देश दिले.

खेड–भीमाशंकर महामार्ग आणि शिरूर–उरण रस्त्यास मंजुरी दिल्याबद्दल आ. बाबाजी काळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार मानले. या बैठकीस माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## हवेली पंचायत समितीच्या इमारतीला २० लाखांचा निधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर :** राज्यात आर्थिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या हवेली तालुका पंचायत समितीच्या ऐतिहासिक इमारतीच्या दुरुस्तीसाठी अखेर निधी उपलब्ध झाला आहे. अनेक वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या या इमारतीसाठी हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके आणि आमदार भिमराव तापकीर यांनी आपल्या आमदार निधीतून प्रत्येकी १० लाख रुपये, असा एकूण २० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

या निधीमुळे इमारतीची दुरवस्था दूर होण्यास मदत होणार असून कर्मचारी तसेच दररोज कामानिमित्त येणाऱ्या शेकडो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

हवेली पंचायत समितीचा कारभार सध्या पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील जुन्या जिल्हा परिषद इमारतीतून चालवला जातो. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून दुरुस्ती न झाल्याने इमारतीची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. मुख्य यशवंतराव चव्हाण सभागृह, विविध प्रशासकीय विभाग तसेच छतांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली असून येथे काम करणारे कर्मचारी, पदाधिकारी आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.

## सारांश वृत्त

### सपा प्रवक्ते भाटी यांच्यावर गुन्हा दाखल

**मुझफ्फरनगर :** समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते राजकुमार भाटी यांच्या विरोधात ब्राह्मण समाजाविरुद्ध आक्षेपार्ह टिप्पणी केल्याप्रकरणी मंगळवारी एफआयआर दाखल करण्यात आला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. वरिष्ठ पोलीस अधीक्षक संजय कुमार यांनी येथे पत्रकारांना सांगितले की, जसवीर सिंग यांनी तक्रार दाखल केल्यानंतर सिव्हिल लाइन्स पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### सपा-काँग्रेस युती कायम राहील

**लखनौ** : समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी मंगळवारी सांगितले की, भविष्यातील निवडणुकांमध्येही मित्रपक्षांसोबतची युती कायम राहील आणि 'जागा नव्हे, तर विजय' हेच सूत्र असेल. एका कार्यक्रमात, आगामी निवडणुकीत काँग्रेस नेते राहुल गांधी आणि आपण एकत्र प्रचार करताना दिसणार का, असे विचारले असता, यादव म्हणाले की, त्यांच्या पक्षाला आघाडी चालवण्याचा दांडगा अनुभव आहे आणि या व्यवस्थेतून आपल्या मित्रपक्षांना फायदा होईल याची ते नेहमीच खात्री करतात. आम्ही कधीही कोणाचा विश्वासघात केलेला नाही. आज अस्तित्वात असलेली आघाडी पुढेही कायम राहील, असे यादव म्हणाले.

### अवैध शस्त्र युनिटचा पर्दाफाश

**कोलकाता** : बिहारच्या पूर्णा जिल्ह्यात एका अवैध शस्त्रनिर्मिती युनिटचा पर्दाफाश केल्यानंतर पाच जणांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. दमदाहा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हरिपूर गावात कागदी प्लेट बनवणाऱ्या कारखान्याखाली एका भूमिगत खोलीत चालणारा 'मिनी गन कारखाना' रविवारी संध्याकाळी कोलकाता पोलीस एसटीएफ आणि बिहार एसटीएफने केलेल्या संयुक्त कारवाईत उघडकीस आणला, असे त्यांनी सांगितले. शस्त्रनिर्मिती लपवण्यासाठी आणि त्यादरम्यान निर्माण होणारा आवाज दाबण्यासाठी खास तयार केलेल्या भूमिगत कक्षाचा वापर केला जात होता.

## एका आठवड्यात दुसऱ्यांदा दरवाढ

# पेट्रोल-डिझेल यांच्या किंमतीत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** जवळपास चार वर्षांच्या स्थगितीनंतर सरकारी तेल कंपन्यांनी इंधन दरवाढीचा निर्णय पुन्हा सुरू केला असून मंगळवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर सुमारे ९० पैशांची वाढ करण्यात आली. एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीत झालेली ही दुसरी दरवाढ आहे. यापूर्वी शुक्रवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांची वाढ करण्यात आली होती.

नवीन दरांनुसार नवी दिल्लीमध्ये पेट्रोलचा दर ९८.६४ रुपये प्रति लिटर झाला असून डिझेलचा दर ९१.५८ रुपये प्रति लिटरवर पोहोचला आहे. याआधी पेट्रोल ९७.७७ रुपये आणि डिझेल ९०.६७ रुपये प्रति लिटर दराने विकले जात होते.

इराणमधील संघर्ष आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावामुळे जागतिक कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे जागतिक तेल वाहतुकीवर परिणाम झाला असून कच्च्या तेलाचे दर ५० टक्क्यांहून अधिक वाढल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे सरकारी तेल कंपन्यांवरील आर्थिक ताण वाढला असून त्यातील काही भार ग्राहकांवर टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसच्या दरातही सलग वाढ होत आहे. १५ मे रोजी दिल्ली, मुंबईसह अनेक शहरांत सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर रविवारी पुन्हा प्रति किलो १ रुपयांची वाढ करण्यात आली. मूल्यवर्धित कर (व्हॅट) वेगवेगळा असल्यामुळे प्रत्येक राज्यातील इंधन दरांमध्ये फरक दिसून येत आहे. मुंबईमध्ये पेट्रोलचा दर आता १०७.५९ रुपये तर डिझेलचा दर ९४.०८ रुपये प्रति लिटर झाला आहे. कोलकात्यात पेट्रोल १०९.७० रुपये आणि डिझेल ९६.०७ रुपये प्रति लिटर झाले आहे. चेन्नईमध्ये पेट्रोलचा दर १०४.४९ रुपये आणि डिझेलचा दर ९६.११ रुपये प्रति लिटरपर्यंत पोहोचला आहे.

केंद्र सरकारने यापूर्वी जागतिक ऊर्जा संकटाचा फटका सामान्य नागरिकांना बसू नये म्हणून इंधन दर दीर्घकाळ स्थिर ठेवले होते. मात्र विरोधकांनी राज्य निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दरवाढ टाळण्यात राजकीय हेतू असल्याचा आरोप केला होता. निवडणुकांनंतर लगेचच दरवाढ करण्यात आल्याने या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या माहितीनुसार, १५ मे रोजी झालेल्या दरवाढीनंतरही तेल कंपन्यांना दररोज सुमारे ७५० कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. उद्योग क्षेत्राच्या अंदाजानुसार, आतापर्यंत झालेली दरवाढ ही आवश्यक असलेल्या एकूण वाढीच्या केवळ पाचव्या भागाइतकीच आहे. त्यामुळे पुढील काळात आणखी दरवाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, वाढत्या ऊर्जा खर्चाचा परिणाम भारताच्या परकीय चलन साठ्यावर आणि चालू खात्यातील तुटीवर होत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन केले आहे. घरून काम करण्याला प्राधान्य देणे, अनावश्यक प्रवास टाळणे आणि इंधनाचा कमी वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अनेक राज्य सरकारांनीही विभागांना प्रवास मर्यादित ठेवण्याच्या आणि प्रत्यक्ष बैठका कमी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## इंधन दरवाढीवरून काँग्रेसचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पेट्रोल-डिझेलच्या दरात झालेल्या ताज्या वाढीवरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. सरकार सर्वसामान्य नागरिकांवर महागाईचा बोजा टाकत असून व्यावसायिक हितसंबंधांना संरक्षण देत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सरकारी तेल कंपन्यांनी जवळपास चार वर्षांनंतर इंधन दरवाढीवरील स्थगिती हटवल्यानंतर, एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीत ही दुसरी दरवाढ करण्यात आली आहे. मंगळवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर सुमारे ९० पैशांनी वाढ करण्यात आली. याआधी शुक्रवारी प्रति लिटर ३ रुपयांची वाढ जाहीर करण्यात आली होती.

सोशल मीडियावरील पोस्टमध्ये खर्गे म्हणाले, “दरवाढीच्या अवघ्या चार दिवसांनंतर मोदी सरकारने पुन्हा पेट्रोल-डिझेल महाग केले आहे. बचतीचे उपदेश करून आपल्या अपयशाचे ओझे जनतेवर टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे.” त्यांनी आरोप केला की, “सामान्य जनतेला लुटणे आणि अदानींना मोकळीक देणे हे मोदी सरकारचे तडजोडीचे मॉडेल आहे.” अमेरिकेच्या न्याय विभागाने उद्योगपती गौतम अदानी आणि सागर अदानी यांच्यावरील फौजदारी आरोप मागे घेतल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे वक्तव्य केले.

रशियाकडून तेल खरेदीच्या मुद्द्यावरूनही खर्गे यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. “स्वतःला ‘विश्वगुरू’ म्हणवणारे मोदी अमेरिकेकडे रशियन तेल खरेदीसाठी मुदतवाढ मागत आहेत. त्यामुळे भारताच्या स्वाभिमानाला धक्का बसत आहे,” असा आरोप त्यांनी केला.

## देशातील पहिल्या बुलेट ट्रेनचे अनावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेनला प्रत्यक्ष प्रवास सुरू होण्यासाठी अजून जवळपास एक वर्षाचा कालावधी बाकी असला, तरी भारतीय रेल्वे ने नवी दिल्लीतील रेल भवन येथे या ट्रेनच्या प्रतिमेचे जनतेसाठी अनावरण केले आहे.

रेल भवनच्या गेट क्रमांक ४ वर प्रदर्शित करण्यात आलेल्या प्रतिमेनुसार, देशातील पहिल्या बुलेट ट्रेनला केशरी रंगाचे छत असणार असून मुख्य भागावर काळ्या आणि केशरी रंगाच्या आकर्षक पट्ट्या दिसणार आहेत. या डिझाइनमध्ये एरोडायनॅमिक पुढचा भाग आणि डोळ्यांच्या आकाराचे आधुनिक हेडलाईट्स देण्यात आले असून त्यामुळे ट्रेनला भविष्यवेधी स्वरूप प्राप्त झाले आहे. भारताची पहिली बुलेट ट्रेन मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल कॉरिडॉर या ५०८ किलोमीटर लांबीच्या मार्गावर धावणार असून १५ ऑगस्ट २०२७ रोजी सेवा सुरू होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. रेल्वे सूत्रांच्या माहितीनुसार, सुरुवातीला गुजरातमधील सुरत ते वापी या सुमारे १०० किलोमीटरच्या पट्ट्यावर सेवा सुरू होऊ शकते.

मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरमध्ये एकूण १२ स्थानके असतील. सर्व थांबे धरून मुंबई ते अहमदाबाद हा प्रवास सुमारे २ तास १७ मिनिटांत पूर्ण होईल, असा अंदाज आहे.

## भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालय कठोर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांच्या घटनांवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी महत्त्वपूर्ण निर्णय देत मानवी जीविताला धोका ठरणाऱ्या आक्रमक आणि धोकादायक भटक्या कुत्र्यांना इच्छामरण देण्यास संबंधित अधिकाऱ्यांना परवानगी दिली आहे. त्याचवेळी, भटक्या कुत्र्यांचे स्थलांतर आणि नसबंदी प्रक्रियेबाबत ७ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशात बदल करण्याची मागणी करणारे सर्व अर्ज न्यायालयाने फेटाळून लावले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, भारतीय पशु कल्याण मंडळाच्या मानक कार्यप्रणालीमध्ये हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे त्या नियमांना आव्हान देणारे सर्व अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांना प्राणी जन्म नियंत्रण केंद्रांची संख्या वाढवण्याचे निर्देश दिले. प्रत्येक जिल्ह्यात किमान एक पूर्णपणे कार्यरत एबीसी केंद्र सुरू करण्यासह लोकसंख्या घनतेनुसार अतिरिक्त केंद्रे उभारण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच रेबीज प्रतिबंधक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याचेही आदेश राज्यांना देण्यात आले आहेत. राष्ट्रीय महामार्गांवरील भटक्या जनावरांच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणालाही निर्देश देण्यात आले. आवश्यक वाहने तैनात करून समन्वय यंत्रणा उभारण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

न्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले की, देशभरात कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे. राजस्थानातील श्री गंगानगर येथे एका महिन्यात १,०८४ कुत्रा चावल्याच्या घटना नोंदवण्यात आल्या, तर तामिळनाडूमध्ये यंदाच्या पहिल्या चार महिन्यांत दोन लाखांहून अधिक प्रकरणे समोर आली आहेत. विमानतळ, निवासी भाग आणि शहरी केंद्रांमध्येही अशा घटना वाढत असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

दिल्लीतील आयजीआय विमानतळासह अनेक ठिकाणी कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटना घडल्याचा उल्लेख करत न्यायालयाने त्रुटींवर ताशेरे ओढले. न्यायालयाने स्पष्ट केले की, संविधानाने दिलेल्या सन्मानाने जगण्याच्या हक्कात नागरिकांना कुत्र्यांच्या हल्ल्याच्या भीतीशिवाय सुरक्षित जीवन जगण्याचाही अधिकार आहे. शासन केवळ निष्क्रिय प्रेक्षक राहू शकत नाही, असे कठोर निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले.

## राजकीय टीका आणि व्यंग हा देशद्रोह नाही...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** “लोकशाही व्यवस्थेत राजकीय टीका, उपहास आणि मतभेद यांना देशद्रोह किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न मानता येणार नाही,” असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मद्रास उच्च न्यायालयाने तामिळनाडू पोलिसांनी विश्व हिंदू परिषदेच्या प्रादेशिक ‘एक्स’ हँडलवरील पोस्ट ब्लॉक करण्यासाठी दिलेल्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली आहे.

वृत्तानुसार, माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील कलम ७९(३)(ब) आणि आयटी नियम २०२१ च्या नियम ३(१)(ड) अंतर्गत तामिळनाडू पोलिसांनी ‘एक्स’ प्लॅटफॉर्मला अनेक यूआरएल हटवण्याचे किंवा ब्लॉक करण्याचे निर्देश दिले होते. ८ मे रोजी जारी करण्यात आलेल्या या नोटिशीविरोधात तामिळनाडू विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष पी. चोकलिंगम यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, पोलिसांनी वेगवेगळ्या वापरकर्त्यांच्या अनेक पोस्ट एकाच आदेशाखाली एकत्रित करून ब्लॉक करण्याचे निर्देश दिले. संबंधित पोस्टचा संदर्भ, त्यातील मजकूर किंवा घटनात्मक संरक्षणाचा स्वतंत्रपणे विचार करण्यात आला नाही. तसेच संबंधित वापरकर्त्यांना कोणतीही पूर्वसूचना किंवा आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली नसल्याचा आरोपही करण्यात आला.

न्यायमूर्ती एल. व्हिक्टोरिया गौरी आणि न्यायमूर्ती एन. सेंथिलकुमार यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, “राजकीय टीका, व्यंग, मतभेद आणि सार्वजनिक वादविवाद हे भारतीय राज्यघटनेच्या कलम १९(१)(अ) अंतर्गत संरक्षित मूलभूत अधिकार आहेत. टीकेला सुव्यवस्थेचा भंग, उपहासाला देशद्रोह किंवा मतभेदाला गुन्हेगारी स्वरूप देणे योग्य ठरू शकत नाही.”

## खासदाराच्या दाव्याने राजकीय चर्चांना उधाण

# तेलंगणाचे रेवंत रेड्डी भाजपमध्ये?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाचे खासदार धर्मपुरी अरविंद यांनी तेलंगणाच्या राजकारणात खळबळ उडवणारा दावा केला आहे. पश्चिम बंगालमधील भाजप नेते शुभेंदू अधिकारी यांच्या पावलावर पाऊल ठेवत तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी भविष्यात काँग्रेस पक्ष सोडू शकतात, असा दावा अरविंद यांनी केला. या वक्तव्यानंतर तेलंगणातील राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून काँग्रेसने भाजपवर जोरदार टीका केली आहे.

माध्यमांशी बोलताना खासदार धर्मपुरी अरविंद म्हणाले की, २०२८-२९ च्या तेलंगणा विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा मोठा पराभव होईल. “१९८५ आणि १९९४ प्रमाणे काँग्रेसला पुन्हा एकदा ऐतिहासिक पराभवाला सामोरे जावे लागेल. रेवंत रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे भवितव्य धोक्यात येईल,” असा दावा त्यांनी केला.

अरविंद यांनी रेवंत रेड्डी आणि पश्चिम बंगालमधील भाजप नेते शुभेंदू अधिकारी यांची तुलना केली. अधिकारी यांनी २०२० मध्ये तृणमूल काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्याच धर्तीवर रेड्डी देखील पक्षांतर करू शकतात, अशी अटकळ त्यांनी व्यक्त केली. १० मे रोजी झालेल्या एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यातील संवादानंतर या चर्चांना आणखी हवा मिळाली. विकास प्रकल्पांसाठी केंद्राकडून अधिक मदतीची मागणी करताना रेड्डी यांनी केंद्र सरकारकडे विनंती केली होती. त्यावर पंतप्रधान मोदी यांनी मिश्किल शैलीत, “तुम्ही माझ्यासोबत आलात तर अधिक चांगले होईल,” असे वक्तव्य केले होते. या वक्तव्यावर भाष्य करताना अरविंद म्हणाले, “यामागे नेमके काय राजकारण आहे हे मला माहीत नाही. काही घडामोडी सुरू आहेत का, किंवा शुभेंदू अधिकारी यांच्यासारखी परिस्थिती निर्माण होणार आहे का, हे सांगता येणार नाही.” त्यांनी काँग्रेस नेतृत्वावर टीका करत, “रेवंत रेड्डी यांना मुख्यमंत्री बनवणे ही काँग्रेसची मोठी चूक होती. पक्षासाठी दशकानुदशके काम करणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले,” असे म्हटले.

या वक्तव्यामुळे तेलंगणा काँग्रेस आक्रमक झाली आहे. प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते मेडी रविचंद्र यांनी भाजप खासदाराने मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेतृत्वावर वैयक्तिक व अशोभनीय टीका केल्याचा आरोप केला. “राज्यात काँग्रेस सरकार आल्यानंतर विकासकामांना गती मिळाली आहे. मात्र भाजप नेते सरकारची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करत आहेत,” असे ते म्हणाले.

## संदीप घोष यांच्यावरील खटल्यास मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल सरकारने आर. जी. कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलचे माजी प्राचार्य संदीप घोष यांच्याविरोधात त्यांच्या कार्यकाळातील कथित आर्थिक अनियमिततेप्रकरणी खटला चालवण्यास मंजुरी दिली आहे.

राज्याच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाने सोमवारी जारी केलेल्या आदेशानुसार, राज्यपालांनी सक्षम प्राधिकारी म्हणून भारतीय न्याय संहिता, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा आणि मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायदा अंतर्गत घोष यांच्यावर खटला भरण्यास मंजुरी दिली. आदेशात नमूद करण्यात आले आहे की, एफआयआर आणि संबंधित कागदपत्रांसह प्रकरणातील सर्व नोंदींची “पूर्णपणे आणि काळजीपूर्वक तपासणी” केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. हे प्रकरण संदीप घोष यांच्या प्राचार्यपदाच्या काळात आर. जी. कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील खरेदी प्रक्रिया आणि इतर व्यवहारांमधील कथित आर्थिक गैरव्यवहाराशी संबंधित आहे.

कलकत्ता उच्च न्यायालय ने २३ ऑगस्ट २०२४ रोजी एका याचिकेवरील सुनावणीत या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले होते. सुरुवातीला ताला पोलीस ठाण्यात नोंदवलेला गुन्हा नंतर केंद्रीय अन्वेषण विभागाच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेकडे वर्ग करण्यात आला.

सीबीआयने त्यानंतर संदीप घोष आणि ‘माँ तारा ट्रेडर्स’, ‘इशान कॅफे’ व ‘खामा लोहा’ या तीन संस्थांविरोधात गुन्हेगारी कट, फसवणूक आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत नियमित गुन्हा दाखल केला.

या आदेशात पुढे नमूद करण्यात आले आहे की, कथित गुन्हे पीएमएलए अंतर्गत अनुसूचित गुन्ह्यांच्या श्रेणीत येत असल्याने अंमलबजावणी संचालनालयाने ऑगस्ट २०२४ मध्ये ईसीआयआर नोंदवून मनी लाँडरिंगची चौकशी सुरू केली. “प्राथमिकदृष्ट्या उपलब्ध सामग्रीवरून संदीप घोष यांनी गुन्हेगारी स्वरूपाची कृत्ये केली किंवा कर्तव्यात कसूर केली असल्याचे दिसून येते,” असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## विजय सरकार केव्हाही कोसळेल

**चेन्नई :** सी. जोसेफ विजय यांचे सरकार कधीही कोसळू शकते, असा मोठा दावा तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी केला आहे. तसेच द्रमुकच्या पदाधिकाऱ्यांना निवडणुकीसाठी तयार राहावे, असे आवाहनही त्यांनी केले होते. यापूर्वी डीएमकेच्या आमदारांनीही सध्याचे सरकार ६ महिन्यांत कोसळेल, असा दावा केला होता. वृत्तानुसार, स्टालिन यांनी आपल्या जिल्हा सचिवांना सांगितले आहे की, 'सध्याचे सरकार कधीही कोसळू शकते.'

## केजरीवाल, सिसोदिया यांच्यासह ‘आप’ नेत्यांना न्यायालयाची नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आम आदमी पार्टी चे प्रमुख अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, संजय सिंह, सौरभ भारद्वाज, दुर्गेश पाठक आणि इतरांविरोधात दाखल करण्यात आलेल्या फौजदारी अवमान प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने नोटीस बजावली.

न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी स्वतःहून दाखल केलेल्या अवमान प्रकरणावर सुनावणी करताना खंडपीठाने संबंधित नेत्यांना उत्तर दाखल करण्यासाठी चार आठवड्यांचा अवधी दिला. “नोटीस जारी करण्यात येत आहे. कथित अवमानकर्त्यांनी नोटीस प्राप्त झाल्यानंतर चार आठवड्यांत आपले उत्तर सादर करावे,” असे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ ऑगस्ट रोजी होणार आहे.

१४ मे रोजी न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी उत्पादन शुल्क धोरण प्रकरणाशी संबंधित त्यांच्या विरोधातील सोशल मीडिया पोस्टच्या पार्श्वभूमीवर केजरीवाल, सिसोदिया यांच्यासह अन्य नेत्यांविरोधात फौजदारी अवमान कारवाई सुरू केली होती. न्यायमूर्ती शर्मा यांनी आपल्या आदेशात नमूद केले होते की, संबंधित नेत्यांनी कायदेशीर पर्यायांचा अवलंब करण्याऐवजी सोशल मीडियावर त्यांच्या विरोधात बदनामी मोहीम राबवली. कामकाजाच्या व्हिडिओ क्लिप्स मोठ्या प्रमाणात प्रसारित करून कथानक उभे करण्याचा प्रयत्न केला गेला.

## उत्तर भारतात उष्णतेचा कहर; उष्णतेची लाट कायम

# जगातील १०० सर्वाधिक उष्ण शहरांमध्ये भारतातील शहरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेश, बिहारसह संपूर्ण उत्तर भारतात भीषण उष्णतेची लाट उसळली असून तापमानाने अनेक ठिकाणी ४६ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. मंगळवारी जगातील सर्वाधिक उष्ण १०० शहरांच्या यादीत सर्वच्या सर्व शहरे भारतातील असल्याची धक्कादायक माहिती एका जागतिक तापमान क्रमवारीतून समोर आली आहे. यामुळे सध्या जगातील सर्वाधिक उष्ण परिस्थिती भारतात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या यादीत उत्तर प्रदेशातील औरैया, बांदा आणि इटावा या जिल्ह्यांनी अव्वल स्थान पटकावले. दुपारच्या सुमारास येथे तापमान ४६ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक नोंदवले गेले. दिल्ली, गुरुग्राम, फरीदाबाद, चंदीगड, आग्रा आणि वाराणसी यांसारख्या शहरांमध्येही उष्णतेने विक्रमी पातळी गाठली. देशातील इतर भागांतही उष्णतेचा तडाखा कायम आहे. हरियाणातील अलीगड, मैनपुरी, कुरुक्षेत्र, पानिपत आणि कर्नाल येथे तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. पंजाब, हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि ओडिशाच्या अनेक भागांमध्येही पारा ४४ अंशांच्या आसपास नोंदवला गेला. प्रयागराज, हिसार, जालंधर, बठिंडा, सतना आणि बलांगीर या शहरांमध्येही उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणात जाणवली.

भारतीय हवामान विभागाने १९ मे रोजी उष्णतेबाबत विशेष इशारा जारी केला आहे. पुढील काही दिवसांत वायव्य भारतातील अनेक भागांमध्ये कमाल तापमानात आणखी २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, मध्य प्रदेश आणि विदर्भ या भागांत संपूर्ण आठवडाभर उष्णतेची लाट कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

पश्चिम उत्तर प्रदेशात २४ मेपर्यंत, तर पूर्व उत्तर प्रदेशात २० मेपर्यंत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने नागरिकांना दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळण्याचे, पुरेसे पाणी पिण्याचे आणि आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, अनेक राज्य सरकारांनी उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शासकीय विभागांना प्रवास कमी करण्याच्या आणि प्रत्यक्ष बैठका मर्यादित ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेमुळे आरोग्य यंत्रणाही सतर्क करण्यात आली आहे.